नियमित दिवाणी मुकदमा क्र.१/२०१५
निशाण क्र.१०४ लगत

## उलट तपास वादी यांचा प्रतिवादी क्र.१,२,४ते६,८ते१९, २१ते२५ तर्फे विधिज्ञ श्री. पी.एस.रानडे यांचेमार्फत शपथेवर सुरु—

१७. दाव्यासोबत दाखल केलेल्या वंशावळी मधील मूळ पुरुष लक्ष्मण याचे संपूर्ण नाव लक्ष्मण कानोजी पुजारे होते. लक्ष्मणच्या नावाने गावामध्ये स्थावर मिळकतीचे खाते होते. हे म्हणणे खरे आहे की, त्याचा खाते उतारा मी घेतलेला आहे. मूळ पुरुष लक्ष्मण यांचा मृत्यू कधी झाला हे मला सांगता येणार नाही. लक्ष्मणच्या स्थावर मिळकतीसंदर्भात वारस तपास झाला.वारस तपास किती साली झाला व किती क्रमांकाने झाला हे मला सांगता येणार नाही. लक्ष्मणच्या वारस रजिस्टरचा उतारा मी घेतलेला आहे. मी तो याकामी हजर केला आहे. याच न्यायालयात लक्ष्मणच्या वारसांनी नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६८/१९९४ हा दावा दाखल केला होता किंवा नाही याची मला माहीती नाही. तो दावा दाखल झाल्याचा व निकाल झाल्याचा उल्लेख आम्ही या दाव्यात केला आहे. त्या दाव्याच्या कागदपत्रांच्या सहीशिक्कयाच्या नक्कला आम्ही घेतल्या आहेत. लक्ष्मणचे वारस म्हणून आम्ही एका मिळकतीच्या वाटपाकरिता तो दावा दाखल केला होता असे मला आढळले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही या दाव्यात सादर केलेलीच वंशावळ त्या दाव्यात सादर केली होती. नियमित दिवाणी मुकदमा क्र.६८/१९९४ मध्ये मूळ पुरुष लक्ष्मण याचेच वारस हक्क त्या दाव्यातील वादीनी त्या दाव्यात सांगीतले होते. नियमित दिवाणी दावा क्र.६८/१९९४ मधील वंशावळ व प्रस्तुत दाव्यातील वंशावळ ही एकच आहे. हे म्हणणे खरे नाही की, नियमित दिवाणी दावा क्र.६८/१९९४ हा दावा लक्ष्मणच्या वारस शाखेतील पुढारी या नात्याने दाखल केला होता. म्हादजी शाखेतील येसू उर्फ यशवंत गणू हा मोठया व वडीलकीच्या शाखेतील आहे. साक्षीदारास निशाणी क्र.१०३ ला असलेला उतारा दाखविणेत आला. त्या दाव्यात येसू उर्फ यशवंत गणू हा वादी क्र.४ होता. हे म्हणणे खरे आहे की, येसाजीच्या शाखेमधील धनाजी शंकर हा वडीलकीचा माणूस होता. हे म्हणणे खरे आहे की, येसाजीच्या शाखेतील भिकाजी मुलगा मालू याचा नातू जानू हा त्यांच्या शाखेचा कर्ता होता. हे म्हणणे खरे आहे की, येसाजीची तिसरी शाखा

गणूची होती. सदर गणू याला नारायण येसू हा नातू होता. हे महणणे खरे आहे की, नारायणचा नातू धोंडू हा त्यांच्या शाखेचा कर्ता होता. हे म्हणणे खरे आहे की, बाबाजी याच्या म्हादजी व गोविंद अशा दोन शाखा होत्या. हे म्हणणे खरे आहे की, म्हादजी शाखेतील पाया याच्या शाखेतील प्रकाशराव हा पुढारी होता. हे म्हणणे खरे आहे की, बाबाजीची दुसरी शाखा गोविंद याची होती. हे म्हणणे खरे आहे की, गोविंद बाबाजी चा मुलगा बाबू याला राम व गोविंद असे दोन मुले होते. हे म्हणणे खरे आहे की, बाबू गोविंद या शाखेचा विश्वनाथ रामचंद्र पुजारे हा कर्ता होता. हे म्हणणे खरे आहे की, गोविंद बाबाजीचा दुसरा मुलगा कानू उर्फ कानोजी याच्या मोठया शाखेचा कर्ता सिताराम गंगाराम हा होता. सिताराम गंगाराम हा त्या दाव्यात वादी क्र.७ होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यातील प्रतिवादी क्र.१ ते २२ यांना आपआपल्या शाखेतील प्रतिनिधी म्हणून ओळखले जात होते.

उलटतपास उभय पक्षकारांचे विधीज्ञांनी केलेल्या विनंतीवरुन पुढील तारीखपर्यंत तहकूब केला.

श्रवणोत्तर स्विकृत
सही/—
दि. २१/११/२०१८ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवगड